# ॥ अस्तित्व ॥

## प्रल्हादराय कागझी इन्स्टिट्यूट फॉर हॅन्डिकॅप्ड

प्लॉट नं. ८, फेज - १, स्टेट बँक रोड, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व)
दूरध्वनी : ९८३३५५६९८१
E-mail : astitvatrust81@gmail.com
Visit us at : http//www.astitvaschool.co.in

स्थापना १९८१




# ४५ वा वार्षिक अहवाल

## २०२५ - २०२६

*** नोंदणी ***

दि सोसायटी रजि.ॲक्ट. १८६० एमएएच/९२२/ठाणे
दि बॉम्बे पब्लिक ट्रस्टस् ॲक्ट १९५० एफ ८२९/ठाणे

देणगीदारांना आयकर अधिनियम ८० जी (५) नुसार सवलत उपलब्ध

Income Tax Exemption Certificate Under 80 G : II Clause (i) of first proviso to sub-section (5) of section 80 G dt.24.9.2021 valid from AY 2022.23 to AY 2026.27

## स्वातंत्र्य दिन - दि.१५ ऑगस्ट २०२५




सौ.मंगला कुमावत (मूकबधिर विभाग कलाशिक्षिका) व सौ.वंदना बिऱ्हाडे (मतिमंद विभाग कलाशिक्षिका) या सेवानिवृत्त होत असल्याने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सोबत संस्थापक अध्यक्ष डॉ.एस.व्ही.आडकर, अध्यक्ष श्रीमती राधिका गुप्ते व संस्थेचे सर्व विश्वस्त.



मूक बधिर प्रबोधिनी मधील लेखापाल सौ.नीता शिरवळकर यांचा मुलगा आर्यन याने आफ्रिका खंडातील तांझानिया येथील सर्वोच्च शिखर किलिमांजारो सर केल्याबद्दल संस्थेकडून त्याचा गौरव करण्यात आला.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

मतिमंद, मुकबधिरांसाठी शाळा, संरक्षित कर्मशाळा, कर्मशाळा, मतिमंदांसाठी वसतिगृह आणि वृध्दाश्रम चालविणा-या डोंबिवली येथील अस्तित्व या संस्थेची आर्थिक वर्ष 2025-26 ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 27/09/2026 रोजी 10.30 वाजता संस्थेच्या वास्तूत आयोजित केली आहे. तरी आपण सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

## सभेपुढील कामकाज

1. 06 सप्टेबर 2026 ते 05 सप्टेबर 2031 ह्या पंचवर्षीय कालावधीसाठी दि 24.08.2026 रोजीच्या निवड प्रक्रियेनुसार निवडून आलेल्या विश्वस्तांच्या पद्भाराची माहिती सभेस देणे.
2. दिनांक 15/08/2025 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत वाचून मंजूर करणे
3. संस्थेचा सन 2025-26 या वर्षाचा अहवाल वाचून लेखा विवरणपत्रे व परिक्षित अहवाल स्वीकृत करणे
4. 2026-27 या वर्षाकरिता सनदी लेखापालांची नियुक्ती करणे व मेहनतांना ठरविणे
5. 06 सप्टेबर 2026 ते 05 सप्टेबर 2031 या पंचवर्षीय कालावधीसाठी करण्यात आलेल्या विश्वस्तांच्या पदाधिकारी निवडीस मंजुरी देणे
6. आश्रयदाते, आजीव सभासद व सर्वसाधारण सभासद हयामधून प्रत्येकी एका सभासदाची 06 सप्टेबर 2026 ते 05 सप्टेबर 2031 या कालावधीसाठी कार्यकारिणीवर निवड केलेल्या सभासदांच्या निवडीस मंजुरी देणे
7. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे

दिनांक : ०५/०८/२०२६

**राधिका गुप्ते**
अध्यक्ष

सूचना :

**सभेच्या नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाच्या अवधीत जर आवश्यक गणसंख्या पूर्ण झाली नाही तर सदर सभा तहकूब करण्यात येईल. अशी तहकूब केलेली सभा, त्याच ठिकाणी, उपरोक्त काम काजाकरिता अर्ध्या तासानंतर म्हणजे सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. याची सभासदांनी नोंद घ्यावी.**

# अस्तित्व

## कार्यकारिणी मंडळ २०२५-२०२६

| अ.क्र | नांव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. एस.व्ही.आडकर | संस्थापक अध्यक्ष-विश्वस्त |
| २ | श्रीमती राधिका गुप्ते | अध्यक्ष |
| ३ | श्री. मनोज प्रधान | सचिव |
| ४ | श्री. प्रविण कुबेर | खजिनदार |
| ५ | डॉ. प्रमोद बाहेकर | सहसचिव |
| ६ | श्री. डी.एस.भामरे | विश्वस्त |
| ७ | श्री. अविनाश परांजपे | विश्वस्त |
| ८ | श्री. माधव सिंग | सभासद, कार्यकारिणी मंडळ |
| ९ | श्री. किरणकुमार पाटील | सभासद, कार्यकारिणी मंडळ |
| १० | श्री.सुहास आंबेकर | सभासद, कार्यकारिणी मंडळ |
| ११ | ॲड. राजकुमार तिवारी | विशेष निमंत्रित |

# वार्षिक अहवाल २०२५ - २०२६

**सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,**

सन 2025-2026 या वर्षाचा 45 वा वार्षिक अहवाल तसेच मा. सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेली लेखाविवरण पत्रे व परिक्षित अहवाल आपणांसमोर सादर करतांना आम्हांस अतिशय आनंद होत आहे.

अहवाल वर्षात संस्थेतील पाचही विभागांमध्ये मिळून एकूण 283 लाभार्थी संख्या होती. कर्मचारी वर्ग - अनुदानित 24, मानद 17, व प्रशासकीय मान्यता प्रलंबित 13 असा एकूण 54 होता.

अहवाल वर्षात डॉ. शोभा पाटील यांनी मानद वैदयकीय अधिकारी म्हणून संस्थेतील सर्व विभागांतील विदयार्थ्यांची वैदयकीय तपासणी केली.

अहवाल वर्षात विविध महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी, रक्षाबंधन, दहीहंडी, श्रावणी शुक्रवार, दसरा, भोंडला, दिवाळी इ. अशा सर्व सणांचा आनंद विदयार्थ्यांनी घेतला.

विदयार्थ्यांच्या व पालकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी शैक्षणिक वर्षात वेळोवेळी पालक सभा घेण्यात येतात. याशिवाय विदयार्थ्यांचे वैयक्तिक आरोग्य व इतर बाबी संदर्भात पालकांशी चर्चा करण्यात येते.

दि. 16 जून 2025 रोजी उन्हाळी सुट्टीनंतर विदयार्थी शाळेत आले. विद्यार्थ्यांना एक वही व एक पेन देऊन त्यांचे नविन शैक्षणिक वर्षात स्वागत करण्यात आले.

दि.21 जून 2025 रोजी संस्थेत तीनही विभागात योगदिन साजरा करण्यात आला.

दि. 07 ऑगस्ट 2025 रोजी गणेश संस्थान, डोंबिवली तर्फे मतिमंद विभागातील 5 विदयार्थ्यांना प्रति रु. 800/-, व 5 विदयार्थ्यांना प्रति रु.900/- अशी एकूण रु.8500/- तसेच मूकबधिर प्राथमिक विभागातील 3 विदयार्थ्यांना प्रति रु. 800/- व 3 माध्यमिक विदयार्थ्यांना प्रत्येकी रु 900/- असे एकूण रु.5100/- असे शैक्षणिक सहाय्य म्हणून आर्थिक मदत मिळाली.

दरवर्षीप्रमाणे दि. 15 ऑगस्ट 2025 रोजी स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. अहवालवर्षात सेवानिवृत्त होत असल्यामुळे सौ. मंगला कुमावत व सौ. वंदना बिऱ्हाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सर्व विभागातील विद्यार्थ्यांनी कवायती सादर केल्या.

दि.8 सप्टेबर 2025 रोजी संस्थेचा 44 वा वर्धापन दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमूख पाहुणे म्हणून संत साहित्यांच्या अभ्यासक सौ प्राची ताई गडकरी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या सर्व विश्वस्तांनी केक कापून अत्यंत उत्साहात दिवस साजरा करण्यात आला.

## संस्थेचा वर्धापन दि.६ सप्टेंबर २०२५




वर्धापन दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून संत साहित्यांच्या अभ्यासक
सौ.प्राची ताई गडकरी ह्यांचे स्वागत करताना संस्थेचे सर्व विश्वस्त.




वर्धापन दिनी केक कापतांना प्रमुख पाहुणे व संस्थेचे सर्व विश्वस्त




वर्धापन दिनानिमित्त संस्थेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी
ह्यांनी संस्थेस सरस्वतीची मूर्ती भेटवस्तू म्हणून देताना संस्थेचे सर्व कर्मचारी व विश्वस्त.

दि. 27 ऑक्टोंबर 2025 रोजी अनुदानित 3 विभाग मतिमंद मुलांची 'शाळा, मूकबधिर प्रबोधिनी, अस्तित्व संरक्षित कर्मशाळा ह्यांना PWD ( सार्वजनिक बांधकाम खाते) ठाणे येथून भाडेमुल्यांकन करून वाजवी भाडे प्रमाणपत्रे मिळाली.

संस्थेतील विश्वस्तांच्या पदांमधील वेळोवेळी होणारे बदल आपण Charity Commissioner, Thane ह्यांना रीतसर पाठवीत असतो. 2018 पासून पाठविलेले फेरफार अहवाल Charity Commissioner येथून मंजूर होणे आवश्यक असल्याने त्यांचे कार्यालयातून नोटीस आल्यामुळे त्यांनी सांगितल्याप्रमाणे आवश्यक तो बदल करून कागदपत्रे पुरविली. यासाठी अध्यक्ष राधिका गुप्ते व लेखापाल नीता शिरवळकर ह्यांनी कार्यालायात जाऊन पाठपुरावा केला व तद्नंतर आपले मागील अद्याप पर्यंतचे, 5 फेरफार अहवाल Charity Commissioner यांचे कडून मंजूर करून आणले.

दि.26 जानेवारी 2026 रोजी 77 वा प्रजासत्ताक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमूख पाहुणे म्हणून लेखक डॉ. श्री. संजय खैरे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे हितचिंतक व लेखक श्री. रमाकांत जाधव व संस्थेचे सर्व विश्वस्त उपस्थित होते. विविध स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

दि. 4 जानेवारी 2026 रोजी शिक्षक व पालकांसाठी शैक्षणिक शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांनी खालील विषयांवर मार्गदर्शन केले

1. म्युझिक थेरपी – ईशा साने

2. दिव्यांगाना बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये मिळणाऱ्या रोजगार संधी – मेधा जांभळे

3. ॲमेझॉन सर्विसेस – पूजा माळोदे

तसेच पालकांसाठी या वर्षी शिबिरात पहिल्यांदाच हस्तकला कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. आपण आयत्या वेळी त्यांना विषय देऊन हस्तकलेच्या वस्तू बनविण्यास सांगितले यात पालकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व बक्षिसे मिळविली यावेळी तीनही विभागातून 104 पालक उपस्थित होते. ह्यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एस व्ही आडकर, सचिव मनोज प्रधान उपस्थित होते व अध्यक्ष राधिका गुप्ते या पूर्ण वेळ उपस्थित होत्या.

दि.7 फेब्रुवारी 2026 रोजी संस्थेत स्नेहसंमेलन झाले. सर्व विभागांतील आदर्श विदयार्थ्यांना गौरविण्यात आले. सर्व विभांगातील विदयार्थ्यांचा नृत्यामध्ये सहभाग होता. योवळी उपस्थित सर्व पालक, विदयार्थी, कर्मचारी, विश्वस्त यांना अल्पोपहार देण्यात आला

दि 20 मार्च 2026 रोजी रायला कॅम्प चे आयोजन रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ह्यांच्या तर्फे (मा. राधिका गुप्ते प्रोजेक्टर चेअर DEI ) यांच्या माध्यमातून विशेष विद्यार्थ्यांसाठी 1 दिवसाचा कॅम्प आयोजित करण्यात आला होता आपल्या तीनही विभांगातून 12 विद्यार्थी व 4 शिक्षक गेले होते.

दि.11 एप्रिल 2026 रोजी संस्थेत आनंदमेळा आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून रोटरी चे अध्यक्ष डॉ.संदिप घरत उपस्थित होते. यावेळी आनंदमेळयात एकूण 35 जणांचे (पालकांचे व विभागांचे) स्टॉल होते.

**विशेष बाब –**

1) दिव्यांग मंत्रालय, मुंबई येथून संस्थेतील अनुदानित तीनही विभागातील 13 रिक्त पदांना पदभरतीसाठी NOC मिळाली. तदनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन दि. 27 व 28 सप्टेंबर 2024 रोजी संस्थेत मुलाखती घेण्यात आल्या त्यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. संजय बागूल साहेब व संस्थेचे सर्व विश्वस्त उपस्थित होते. निवड झालेल्या उमेदवारांना दि. 3 ऑक्टोबर 2024 पासून रुजू करण्यात आले. शासनाकडे त्यांच्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आले, वेळोवेळी सतत पाठपुरावा केला. अध्यक्ष राधिका गुप्ते व लिपिक शिवाजी बिबराळे यांच्या अथक प्रयत्नाने दि. 29 एप्रिल 2026 रोजी 12 पदांना मंजुरी मिळून वेतन चालू झाले आहे 1 पदासाठी पाठपुरावा चालू आहे. तसेच या मुलाखतीचे वेळी सर्व उमेदवारांचे रेकॉर्डिंग करण्यात आले.

2) आपल्या संस्थेस MIDC अंधेरी ऑफिस येथून BCC (Building Completion Certificate) बाबत NO objection certificate मिळालेले आहे हे आपणास माहिती आहेच. सदर पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे संस्थेमध्ये Fire Prevention System लावणे आवश्यक असल्याने अध्यक्ष राधिका गुप्ते यांनी MIDC कार्यालयात वारंवार पाठपुरावा केला, तेथील अधिकाऱ्यांच्या जाऊन भेटी घेतल्या. अथक प्रयत्नाने आपण संस्थेत मे 2026 मध्ये Fire Prevention System बसविण्याचे काम पूर्ण केले.

3) दि. 23 मार्च 2025 रोजी National Atheletics Championship ही स्पर्धा गुजरात विद्यापीठ स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे संपन्न झाली या स्पर्धेत विराज जामदार या विद्यार्थ्यास 3000 मी धावण्याच्या शर्यतीत गोल्ड तर 1500 मी धावण्याच्या शर्यतीत ब्रॉंझ मेडल मिळाले म्हणून संस्थेतर्फे त्याचा दि 11 एप्रिल 2026 रोजी आनंदमेळाच्या दिवशी गौरव करण्यात आला व त्यास रुपये 5000/– धनादेश देण्यात आला.

**भेट : –** दरवर्षी विविध शाळा, कॉलेज चे विदयार्थी, सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी, अनेक मान्यवर, हितचिंतक आपल्या संस्थेस भेट देण्यासाठी येत असतात.

दि. 9 एप्रिल 2025 रोजी social welfare, home ministry of Myanmar and Tata social science Mumbai यांनी संस्थेला भेट दिली.

दि. 11 ऑगस्ट 2025 रोजी डोंबिवली नागरिक बँक येथून 5 महिला कर्मचाऱ्यांनी शाळेला सदिच्छा भेट दिली.

दि. 22 ऑगस्ट 2025 रोजी मातोश्री काशीबेन मोतीलाल पटेल महाविद्यालय येथून 4 विद्यार्थ्यांनी शाळेस भेट दिली.

प्रजासत्ताक दिन - दि.२६ जानेवारी २०२६




प्रजासत्ताक दिनी ध्वजवंदन करतांना प्रमुख पाहुणे लेखक डॉ.श्री.संजय खैरे व संस्थेचे सर्व विश्वस्त



प्रजासत्ताक दिनी कवायत सादर करतांना
मूकबधिर प्रबोधिनीतील विद्यार्थी



प्रजासत्ताक दिनी कवायत  सादर करतांना संरक्षित कर्मशाळेतील विद्यार्थी



प्रजासत्ताक दिनी कवायत सादर करतांना मतिमंद शाळेतील विद्यार्थी

दि .15 सप्टेबर2025 रोजी आमदार श्री राजेश मोरे यांनी संस्थेस त्यांच्या वाढदिवसानिम्मित भेट दिली व मुलांना खाऊ वाटप केले.

दि 16 ऑक्टोबर 2025 रोजी st lawrence school डोंबिवली च्या विद्यार्थ्यांनी शाळेला भेट दिली.

DEEDS संस्थेतून Basic English Literacy Course चालू ठेवण्या बाबत अस्तित्व मुकबधिर प्रबोधिनी विभागात दि.1.4.2025 ते 1.4.2026 या कालावधीत 2 शिक्षक दुपारच्या वेळेत येत होते.

**सहल :-** दि.5 डिसेंबर 2025 रोजी अस्तित्व संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांची सहल प्रति शिर्डी, कार्ला लेणी, एकविरा आई मंदिर,संत तुकाराम महाराज मंदिर देहू येथे नेण्यात आली होती. सर्व विभागातून 155 विद्यार्थी सहलीला गेले होते. यावेळी संस्थेचे खजिनदार श्री.प्रवीण कुबेरा सोबत गेले होते.

**विविध स्पर्धा :-** दि. 8 एप्रिल 2025 रोजी श्री ज्ञानेश्वरी सेवा प्रतिष्टान येथून श्रीराम नवमी निम्मिताने चित्रकला स्पर्धा घेण्यात आली

दि 8 नोव्हेंबर 2025 रोजी AWMH टेबल टेनिस स्पर्धेत 8 विद्यार्थ्यांनी भाग घेतला 04 – गोल्ड, 03 – सिल्वर आणि 01 ब्राँझ मेडल मिळाले.

दि 3 डिसेंबर 2025 रोजी जागतिक अपंग दिन शाळेत साजरा करण्यात आला. विविध मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या व विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली.

20 डिसेंबर 2025 रोजी my achivers trust sports arrange unique athelete distric game state स्पर्धेचे आयोजन कल्याण येथे करण्यात आले त्यात 7 गोल्ड, 3 सिल्वर, 3 ब्राँझ अशी एकूण 13 मेडल्स आपल्याला मिळाली.

दि 18 फेब्रुवारी 2025 रोजी नेहरू सेंटर वरळी येथे चित्रकला स्पर्धा घेण्यात आली, त्यात श्रेयश मोहिते यास द्वितीय क्रमांक व 5 विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली.

दि. 25 मार्च 2025 रोजी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या त्यात मतिमंद विभाग – 08 गोल्ड, 2 सिल्वर, 3 ब्राँझ, कर्मशाळेस 10 मुलांना प्रथम, द्वितीय, तृतीय बक्षिसे मिळाली. मूकबधिर विभागास एकूण 3 बक्षिसे मिळाली त्यात 1 ब्राँझ, 2 सिल्वर.

**मतिमंद विभाग –**

सन 2025–26 या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला पटावर 141 विदयार्थी होते. कर्मचारी – 11 कर्मचारी शासनमान्य व 09 कर्मचारी प्रशासकीय मान्यता प्रलंबित असे एकूण 18 कर्मचारी अहवाल वर्षात कार्यरत होते. (शासकीय –मुख्याध्यापक – 1, स्पीच थेरपिस्ट–1, विशेष शिक्षक – 2, कलाशिक्षक – 2, लिपिक – 1, मदतनीस – 2) ( प्रशासकीय मान्यता प्रलंबित विशेष शिक्षक – 7, संगीत शिक्षक–1, केअरटेकर– 1)

दि. 2 एप्रिल 2025 रोजी जागतिक ऑटिझम अवेअरनेस दिनानिमित्त शाळेतील विदयार्थी व पालकांसाठी Activity घेण्यात आली.

दि 11 एप्रिल 2025 रोजी 18 वर्षावरील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ करण्यात आला व अध्यक्ष राधिका गुप्ते यांच्या हातून मुलांना गिफ्ट वाटप करण्यात आले.

दि 22 मे 2025 रोजी U- dise plus 2025 - 26 चे Progression Activity चे काम पूर्ण झाले.

दि 30 जून 2025 रोजी काळजीवाहक सुशीला लष्कर यांचा सेवानिवृत्ती समारंभ करण्यात आला. त्यांना कार्यमुक्त प्रमाणपत्र देण्यात आले.

दि. 10 जुलै 2025 रोजी NIOS ओरिएंटेशन प्रोग्राम साठी शीतल बांगर या मुंबई इथे गेल्या होत्या.

दि 16 जुलै 2025 रोजी विद्यार्थ्यांना गुड टच बॅड टच वर लेसन दिला.

दि . 29 जुलै रोजी 2025 रोजी नागपंचमी निम्मित विद्यार्थ्यांकडून clay activity मधून नागाची प्रतिकृती तयार करून घेण्यात आले.

दि. 31 जुलै 2025 रोजी मानसशास्त्रज्ञ ज्योती कुलकर्णी यांचा सेवानिवृत्ती समारंभ करण्यात आला. त्यांना कार्यमुक्त प्रमाणपत्र देण्यात आले.

दि 18 सप्टेबर 2025 रोजी गोवेली आरोग्य केंद्र येथून आरोग्य तपासणीसाठी डॉक्टर्स आले होते 113 विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

दि 15 ऑक्टोबर 2025 रोजी दिवाळी सणानिमित्त विद्यार्थ्यांकडून पणत्या रंगवण्याची activity करून घेण्यात आल्या.

दि. 25 नोव्हेंबर 2025 रोजी मतिमंद विभागाला दि. 02/04/2025 ते 30/04/2029 पर्यंत अनुज्ञाप्ती नुतनीकरण प्राप्त झाले.

दि. 31 डिसेंबर 2025 रोजी कलाशिक्षिका सौ वंदना बिऱ्हाडे या वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या तसेच काळजीवाहक मधुकर तिडके यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. दोघांना कार्यमुक्त प्रमाणपत्र देण्यात आले.

दि. 03 फेब्रुवारी 2026 NIOS परीक्षा प्रारंभ लेवल A, B, C परीक्षा सुरु झाली

अस्तित्व शाळा- 10 विद्यार्थी, आस्था हेल्थकेअर - 11, उन्नती स्कूल - 07, प्रथम मुंबई -2

दि 11 फेब्रुवारी 2026 रोजी दिशा प्रोजेक्ट संदर्भात श्रीमती रणखांबे यांनी अचानक भेट दिली, त्यांनी शाळेच्या कामाचे कौतुक केले व सकारात्मक अभिप्राय दिला.

दि. 23 मार्च 2026 रोजी सुनील आखाडे ( कलाशिक्षक) या पदासाठी समायोजन ओर्डर घेऊन शाळेत रुजू झाले.

**शैक्षणिक शिबिर - दि.४ जानेवारी २०२६**




शैक्षणिक शिबिरात वक्त्या श्रीमती ईशा साने यांना स्मृतीचिन्ह देतांना
संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती राधिका गुप्ते



शैक्षणिक शिबिरात वक्त्या मेधा जांभळे, यांना स्मृतीचिन्ह देतांना संस्थापक
अध्यक्ष डॉ.एस.व्ही. आडकर व अध्यक्षा श्रीमती राधिका गुप्ते



शैक्षणिक शिबिरात वक्त्या पूजा माळोदे यांना स्मृतीचिन्ह देतांना संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती राधिका गुप्ते



आयत्या वेळी पालकांना विषय देऊन हस्तकलेच्या वस्तू बनवितांना सर्व पालक

**मूकबधिर विभाग :-** सन 2025-26 या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला पटावर 75 विदयार्थी होते. कर्मचारी - 10 कर्मचारी शासनमान्य व 04 कर्मचारी प्रशासकीय मान्यता प्रलंबित असे एकूण 14 कर्मचारी अहवाल वर्षात कार्यरत होते. ( विशेष शिक्षक - 7, कलाशिक्षक - 2, लेखापाल - 1, लिपिक - 1, शिपाई - 1, केअरटेकर - 2) DEEDS संस्थेतून Basic English Literacy Course चालू ठेवण्या बाबत अस्तित्व मुकबधिर प्रबोधिनी विभागात दि.1.4.2025 ते 1.4.2026 या कालावधीत 2 शिक्षक दुपारच्या वेळेत येत होते.

मूकबधिर विभागाची अनुज्ञाप्ती नुतनीकरण 01 एप्रिल 2025 रोजी संपले सतत पाठपुरावा करूनही अद्याप प्राप्त झाले नाही.

दि. 13 डिसेंबर 2025 रोजी आगरी महोस्तव डोंबिवली तर्फे आयोजित स्पर्धेत 10 विद्यार्थ्यांनी गणेश वंदन हे नृत्य सादर केले. सहभागी विद्यार्थ्यांना रोख रुपये 1500/- आणि ट्रॉफी बक्षीस म्हणून मिळाले.

दि 18 डिसेंबर 2025 रोजी बालरंगभूमी, कल्याण तर्फे आयोजित कलामहोस्तव 10 विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता व नृत्य सादर केले सहभागी विद्यार्थ्यांना रोख रुपये 3000/- आणि प्रमाणपत्र बक्षीस म्हणून मिळाले. यावर्षी ई. 10वीला 10 विद्यार्थी बसले होते, त्यांची बोर्डाची परीक्षा न्यू हायस्कूल, उल्हासनगर आणि एस ई एस उल्हासनगर येथे झाली.

दि 31 डिसेंबर 2025 रोजी कलाशिक्षिका सौ. मंगला कुमावत या वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या, त्यांना कार्यमुक्त प्रमाणपत्र देण्यात आले.

दि.30 जानेवारी 2026 रोजी काळजीवाहक श्रीमती यमुना सोनावणे या वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या, त्यांना कार्यमुक्त प्रमाणपत्र देण्यात आले.

**संरक्षित कर्मशाळा-**

अस्तित्व मतिमंद मुलांच्या संरक्षित कर्मशाळेमध्ये हस्तव्यवसाय, फाईल-बॉक्स, प्राथमिक सुतारकाम कौशल्ये, भरतकाम कौशल्ये, ज्वेलरी मेकींग कौशल्ये, मोल्डींग कौशल्ये या विविध गटामध्ये 41 लाभार्थी आहेत.

विभागात शासनमान्य 4 कर्मचारी व प्रशासकीय मान्यता प्रलंबित 1 कर्मचारी असे एकूण 5 कर्मचारी अहवाल वर्षात कार्यरत होते. 1 निदेशक, 1 लिपिक, 1 मदतनीस, 1 शिपाई व (प्रशासकीय मान्यता प्रलंबित 1 निदेशक)

दि. 25 नोव्हेंबर 2025 रोजी संरक्षित कर्मशाळा विभागाला दि. 02/04/2025 ते 30/04/2029 पर्यंत अनुज्ञाप्ती नुतनीकरण प्राप्त झाले.

**कर्मशाळा -**

विभागात एकूण 31 विदयार्थी आहेत. त्यापैकी 15 विदयार्थी वसतिगृहातील आहेत. श्रीमती सुरेखा गवारे, श्रीमती शर्वरी हळदवणेकर या वसतिगृहाच्या रेक्टर यांनी सकाळी 10 ते 4 यावेळेत वर्कशॉपचे काम जबाबदारीने सांभाळले. कर्मशाळेत मुखशुध्दी, गोडा मसाला, विविध पीठे, मेतकुट, हळद, तिखट, विविध चटण्या, थालिपीठ भाजणी, कागदी व कापडी पिशव्या, ॲप्रन इत्यादी उत्पादने विदयार्थ्यांकडून तयार केली जातात. कु. प्रियांका डोंगरा वसतिगृह केअरटेकर यांनी सकाळी 10.00 ते 12.00 व संध्याकाळी 04.00 ते 7.00 विक्री केंद्र सांभाळले. कर्मशाळेतील विदयार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री करुन रु 96,943/- मिळाले.

कर्मशाळेतील सर्व विदयार्थ्यांना त्यांच्या कौशल्यानुसार संस्थेतर्फे पाठयवेतन त्यांच्या अ,ब,क,ड या ग्रेडनुसार दिवाळी भेट म्हणून दिवाळीत व मार्च महिन्यात देण्यात येते. अहवाल वर्षात कागदी पिशव्या, कापडी पिशव्या, ॲप्रन, विविध भाजण्या, आंबोळीपीठ, हळद, तिखट, गोडा मसाला हया पदार्थांना विशेष मागणी होती, तसेच सिझनमध्ये चिवडा, विविध चटण्या हयांची विक्री जास्त झाली.

अहवाल वर्षात आपल्या कर्मशाळेला आगरी महोत्सवामध्ये विक्रीसाठी मोफत स्टॉल मिळाला, तेथे वसतिगृहातील रेक्टर श्रीमती सुरेखा गवारे व केअरटेकर प्रियंका डोगरा जाऊन जबाबदारीने काम सांभाळले. त्यावेळी आपल्या वस्तूंची मोठया प्रमाणात तिथे विक्री झाली, व नफा रु. 6375/- एवढा मिळाला.

**वसतिगृह -**

अहवाल वर्षात वसतिगृहात 19 मुले व 7 मुली असे 26 विदयार्थी होते. वसतिगृहात 2 रेक्टर, 2 जेन्ट्स केअरटेकर, 2 लेडी केअरटेकर, 2 किचन स्टाफ, 1 भांडीवाली, 1 स्वीपर, 1 वॉचमन, 1 लिपिक असा स्टाफ आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वसतिगृहातील विदयार्थ्यांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. व विविध सण विदयार्थ्यांनी साजरे करून आनंद व्यक्त केला. वसतिगृहात नविन प्रवेश घेणा-या विदयार्थ्यास एक महिना निरीक्षणासाठी प्रवेश दिला जातो व काही समस्या नसेल तर तदनंतर कायम स्वरुपी प्रवेश देण्यात येतो.

डोंबिवलीतील अंडयांचा व्यवसाय करणारे श्री. सुनील शेटये हे दरमहिन्यास 100 अंडी मोफत वसतिगृहातील विदयार्थ्यांसाठी देतात.

डॉ. शोभा पाटील या मानद वैदयकीय अधिकारी वसतिगृहातील विदयार्थ्यांची आठवडयातून दोन वेळा तपासणी करतात. तसेच वेळोवेळी कधीही अडचण आल्यास ताबडतोब संस्थेत येऊन विदयार्थ्यांची तपासणी करतात. वसतिगृहातील विदयार्थ्यासाठी दर मंगळवारी संध्याकाळी 5.30 ते 7.00 या वेळेत श्रीमती विशाखा जोशी संस्थेत येऊन भजन घेतात.

वसतिगृहास अहवाल वर्षात ब-याच देणगीदारांनी धान्य देणगी म्हणून दिले. सौ उल्का गरुड ह्यांनी मार्च 2025 पासून 2 महिन्यांसाठी डोनेशन म्हणून मुलांसाठी ताक दिले.

दि. 26 जानेवारी 2026 रोजी वसतिगृहातील पालकांची मीटिंग घेण्यात आली त्यात 11 पालक उपस्थित होते डॉ आडकर व श्रीमती गुप्ते ह्यांनी वसतिगृहात राहणाऱ्या मुलांची संख्या कमी होत आहे याबद्दल चिंता व्यक्त केली.

सदर दिवशी सर्व पालकांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती, सर्व विश्वस्त, पालक आणि कर्मचारी यांनी त्याचा लाभ घेतला.

**सन्मान वृध्दाश्रम -**

अदययावत सोयीसुविधांनीयुक्त अशा वृध्दाश्रमात 1 मदतनीस दिवसभरासाठी सकाळी 8 ते रात्री 8 व 1 महिला मदतनीस रात्री 8 ते सकाळी 8 नेमण्यात आले आहेत. सध्या वृध्दाश्रमातील पहिल्या प्रवेशित श्रीमती अंजली आवळस्कर वास्तव्यास आहेत. त्यांच्या जेवणाखाण्याची सोय आपल्या वसतिगृहातील किचनमधून केली जाते. आणि त्यांना ते आवडतही आहे.

वृद्धाश्रमातील प्रवेशित संख्या वाढण्याच्या दृष्टीने विश्वस्तांनी मासिक खर्च रु 25000/- वरून रु. 15000/- एवढे करण्याचे ठरविले. 2 स्पेशल रूम ज्यात एसी व टीव्ही अश्या सुविधांनी युक्त करण्यात आल्या. तसेच अल्पकाळासाठी प्रवेशित घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे श्रीमती सुनिता थिटे या 3 महिन्यांसाठी व श्री सुरेश अधिकारी हे 15 दिवसांच्या वास्तव्यासाठी आले होते. श्रीमती सुनिता थिटे यांचे वय 91 वर्षे होते व त्यांच्या मेडिकल इमेर्जन्सीमुळे त्यांच्या नातेवाईकांनी ठाकुर्ली येथील हॉस्पीटलमध्ये हलविले पण दुर्दैवाने तिकडे त्यांचे निधन झाले.

संस्थेच्या वृध्दाश्रमाची माहिती विविध माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जातो.

संस्थेतील सर्व विभागात प्रवेश घेण्यासाठी खालील दस्ताऐवज आवश्यक असतात.

1. शासकीय अपंगत्वाचा दाखला

2. रेशनकार्ड

3. जन्म तारखेचा दाखला

4. वैदयकीय उपचारांचा तपशील

5. आधार कार्ड

6. रक्तगट

## योजना

संस्थेला गेली ४५ वर्षे समाजातील अनेक दानशूर व्यक्तींनी आजपर्यंत मदतीचा हात पुढे केला आहे. यातूनच आपणांस संस्थेची आजची प्रगती दिसत आहे. आजही विविध स्वरूपात संस्थेला देणगी मिळत असते. यासाठी संस्थेच्या खालील योजना आहेत.

आपल्या परिवारातील वाढदिवसानिमित्त अथवा प्रिय व्यक्तींच्या स्मृतीदिनानिमित्त किंवा प्रासंगिक कारणाने खालील योजनेचा विचार करू शकता :वसतिगृहातील साधारण ४५ व्यक्तींसाठी :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एकवेळचा नाश्ता देणगी मुल्य | - | रु. ३०००/- |
| २. | साधे जेवण | - | रु. ४०००/- |
| ३. | एक वेळचे जेवण (शाकाहारी) गोडाचे जेवण | - | रु. ६०००/- |

**नामांकित कंपनीची बिस्किटे, चॉकलेट व फळे खाऊ म्हणून स्वीकारले जातात.**

**रेडिमेड खादय पदार्थ स्वीकारले जात नाहीत.**

पुढीलप्रमाणे देणगी दिल्यास रुम किंवा हॉलला नाव देण्यात येईल :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | रुम | - | रु. १,००,०००/- |
| २. | मिनी हॉल | - | रु. ५,००,०००/- |
| ३. | डायनिंग हॉल | - | रु. १०,००,०००/- |

वस्तुरुपात देणगी :

संस्थेस विविध वस्तू, धान्य, शैक्षणिक साधने, इलेक्ट्रॉनिक वस्तू इत्यादींची आवश्यकता भासते. नवीन वस्तूरुपातील देणग्या देण्याची इच्छा असल्यास संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती राधिका गुप्ते यांच्याशी विचार विनिमय केल्यास संस्थेला आवश्यक असलेल्या वस्तू देता येतील जेणे करून त्यांचा योग्य उपयोग होईल. वापरलेले कपडे आम्ही स्वीकारत नाही.

## वार्षिक स्नेहसंमेलन - दि.७ फेब्रुवारी २०२६




स्नेहसंमेलनात दीप प्रज्वलन करताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.एस.व्ही. आडकर, अध्यक्षा श्रीमती राधिका गुप्ते, सचिव श्री.मनोज प्रधान व खजिनदार श्री.प्रविण कुबेरा.



मतिमंद विभागातील विद्यार्थी नृत्य सादर करतांना.




संरक्षित कर्मशाळेतील विद्यार्थी नृत्य सादर करतांना.




मूकबधिर विभागातील विद्यार्थी नृत्य सादर करतांना.




वसतिगृहातील विद्यार्थी नृत्य सादर करतांना.



मतिमंद विभागातील विद्यार्थ्यांबरोबर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.एस.व्ही.आडकर व मुख्याध्यापक श्री.पद्माकर दाभाडे

**सन 2025-2026 या आर्थिक वर्षात खालील व्यक्तींनी वस्तूरूपात देणगी दिली**

| क्र. | नांव | तपशील |
|---|---|---|
| 1 | शिवानी संतोष बन्सल | 2 कुलर |
| 2. | श्रीमती उल्का गरुड | 40 प्लास्टिक खुर्च्या |
| 3. | हेमल पेटकर | 1 कॅरम, 1 फुटबॉल, 1 व्हॉलीबॉल, 1 टेबल टेनिस |
| 4. | विकास नाकीतवाड | 1 टीव्ही |
| 5. | राधिका गुप्ते | 1 FM |
| 6. | शर्मिला शेलार | 1 वॉकर |
| 7. | डॉ.शोभा पाटील | Weight Machine |
| 8. | नीता शिरवळकर | 10 शाली |

वरील देणगीदारांची संस्था अत्यंत आभारी आहे. तसेच अहवाल वर्षात काही पालक व देणगीदारांनी सर्व विदयार्थ्यांना खाऊ, भेटवस्तूंचे वाटप केले त्याबददल संस्था त्यांची अत्यंत आभारी आहे.

**- श्रध्दांजली -**

संस्थेला अनेक आप्तस्वकीयांचा वियोग अत्यंत जड अंतःकरणाने सहन करावा लागला.

* दि. 04 ऑगस्ट 2025 रोजी फोटोग्राफर श्री जसराज बर्डे यांच्या आईचे दुःखद निधन झाले.
* दि. 04 सप्टेंबर 2025 रोजी वसतिगृहातील विदयार्थी मोरेश्वर कोळी याचे दुःखद निधन झाले.

तसेच इतरही कोणी ज्ञात अज्ञात संस्थेशी संबंधित असलेल्या व्यक्तींच्या मृतात्म्यास ईश्वर सदगती देवो हे त्याचे चरणी आर्जव.

डोंबिवली

दिनांक – 05/08/2026

**राधिका गुप्ते**

अध्यक्ष

## सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.२५००/- व अधिक देणगी देणाऱ्यांची यादी

| | नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | EVONIK CATALYSTS INDIA PVT. LTD., MIDC, DOMBIVLI (E) | ९,००,००० |
| २ | Controlwell India Pvt. Ltd. Dombivli | २५०००० |
| ३ | Sitaram Sugar Allied India Pvt. Ltd., Dombivli (E) | २००००० |
| ४ | शुभचिंतक | १००००० |
| ५ | गिरीश हनुमान खाडे, बोरीवली | ७५००० |
| ६ | सरिता अरूण दातार, विले पार्ले (पू) | ७५००० |
| ७ | Bhimjibhai Manseta Charitable Trust, Mumbai | ५०००० |
| ८ | केशव पांडे, शहाड | ४०००० |
| ९. | एस.आर.जैन चॅरिटेबल ट्रस्ट, कल्याण (प) | ३०००० |
| १० | आरती शरद बेहेरे, ठाणे (प) | २५००० |
| ११ | भेरूलाल राठोड, डोंबिवली (पू) | २५००० |
| १२ | रोकेश गजानन हेगडे, मीरा रोड (पू) | २५००० |
| १३ | माधुरी शशिकांत सहस्त्रबुध्दे, मुलुंड (पू) | २४००० |
| १४ | संगीता नेर्लेकर, डोंबिवली (पू) (कै.विद्याधर नेर्लेकर यांचे स्मरणार्थ/ मालती मधुकर भातखंडे व मधुकर/ गोविंद भातखंडे ह्यांचे स्मरणार्थ) | २१००० |
| १५ | राधे सचिन सिध्दी दळवी, डोंबिवली(प) | २०००० |
| १६ | उल्का शैलेंद्र गरूड, डोंबिवली (प) (कै.शैलेंद्र गरूड यांचे स्मरणार्थ) | २०००० |
| १७ | श्रीधर हुईलगोल, ठाकुर्ली रोड | १५००० |
| १८ | विवेक नारायण देशपांडे, डोंबिवली (पू) | ११००१ |
| १९ | अमित कुंटे, अनंतम, कल्याण | ११००० |
| २० | अशोक कुमार, डोंबिवली (पू) | १०००० |
| २१ | विनय गोगटे, विले पार्ले (पू) | १०००० |
| २२ | नरेंद्र फडके | १०००० |
| २३ | डोंबिवली ब्राह्मण संमोहन, डोंबिवली (पू) | १०००० |
| २४ | नितीन खानोलकर, डोंबिवली (प) | १०००० |
| २५ | बेकर ट्रस्ट | ८००० |
| २६ | श्री.मोहन गुमास्ते, डोंबिवली (पू) | १९,००० |
| २७ | अजित शिरवळकर, डोंबिवली | ७१०० |
| २८ | धीरजलाल अमृतलाल पटेल, डोंबिवली (पू) | ६१०० |
| २९ | सागर ताम्हणे, डोंबिवली (पू) | ६००० |
| ३० | प्रिया राव, डोंबिवली (पू) | ६००० |
| ३१ | मोना म्हात्रे, डोंबिवली (पू) | ६००० |
| ३२ | सोमेश परमार | ६००० |
| ३३ | निनाद शरद जोशी, डोंबिवली (पू) | ६००० |
| ३४ | बेंगाली कल्पतरू असोसिएशन, डोंबिवली | ५००१ |
| ३५ | विद्यासागर नामजोशी, ठाणे (प) | ५००० |
| ३६ | राजेंद्र बाळकृष्ण जोशी, डोंबिवली (पू) (बाळकृष्ण जोशी यांचे स्मरणार्थ) | ५००० |
| ३७ | पूनम जामगावकर, ठाकुर्ली (पू) | ५००० |
| ३८ | विराज रानडे, डोंबिवली (पू) | ५००० |
| ३९ | Gurkul Bright World School, Kalyan Shil Road | ५००० |
| ४० | राज्यश्री पाटील | ५००० |
| ४१ | एकनाथ शंकर कावटकर, दादर | ५००० |
| ४२ | जयंत दातार, डोंबिवली (पू) | ५००० |
| ४३ | गौरी काटकर व नेत्रा फडके, डोंबिवली (पू) (कै.भक्ती देशपांडे ह्यांचे स्मरणार्थ) | ५००० |
| ४४ | कुबेरा विक्रम पुरी, डोंबिवली (पू) | ५००० |
| ४५ | योगेश परमार, डोंबिवली | ५००० |
| ४६ | प्रशांत कोयंडे, डोंबिवली (पू) | ५००० |
| ४७ | अमृतलाल पटेल, डोंबिवली (पू) | ५००० |
| ४८ | नीता शिरवळकर, डोंबिवली | ४५०० |
| ४९ | शैलजा शेंबेकर, डोंबिवली (पू) | ४००० |
| ५० | विद्याधर इनामदार, डोंबिवली (पू) (श्री.श्रीधर इनामदार ह्यांचे स्मरणार्थ/ कै.सुलभा इनामदार ह्यांचे स्मरणार्थ) | ३५०२ |




प्रजासत्ताक दिनी देशभक्तीपर गीत सादर करतांना मतिमंद शाळेतील विद्यार्थी



प्रजासत्ताक दिनी प्रमूख पाहुणे लेखक डॉ.श्री.संजय खैरे यांना स्मृतिचिन्ह देताना संस्थापक अध्यक्ष डॉ.एस.व्ही. आडकर



देणगीदार श्री.गौरव अगरवाल ह्यांच्या गुरुंचा सत्संग कार्यक्रम पार पडल्यावर मुलांसाठी व पालकांसाठी प्रसाद वाटप करताना.



देणगीदार श्री.गौरव अगरवाल ह्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना मुख्याध्यापक श्री.पद्माकर दाभाडे व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.एस.व्ही.आडकर

## सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.२५००/- व अधिक देणगी देणाऱ्यांची यादी

| | नाव | रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५१ | Spahn Ineke जर्मनी | ३४०० | | | |
| ५२ | गौरव अग्रवाल, मुंबई | ३२४० | | | |
| ५३ | श्री.वासुदेव व श्रीमती ज्योस्तना देसाई धर्मादाय विश्वस्तनिधी बँक ऑफ महाराष्ट्र ठाणे (प) | ३२०० | | | |
| ५४ | नरेन खत्री, डोंबिवली (पू) | ३०५१ | | | |
| ५५ | सोमनाथ पाटील, डोंबिवली | ३००० | | | |
| ५६ | कलाईमाथी साहू, डोंबिवली | ३००० | | | |
| ५७ | एन.एस.श्रीधर, डोंबिवली (पू) | ३००० | | | |
| ५८ | विजय सिंद्गीकर, डोंबिवली (पू) | ३००० | | | |
| ५९ | अरूणा भागवत, डोंबिवली (पू) | २५०४ | | | |
| ६० | विजय जोशी, डोंबिवली (पू) | २५०१ | | | |
| ६१ | निखील जाझरुकीया, डोंबिवली | २५०० | | | |
| | एकूण | २१,५१,६०० | | | |

## अहवाल वर्षात खालील व्यक्तींनी आपल्या कौटुंबिक प्रसंगाचे औचित्य साधून वसतिगृहातील मुलांना भोजनासाठी आर्थिक मदत केली.

| | नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | ललित चौधरी, ठाकुर्ली (पू) | ८४००० |
| २ | भवानी केमिकल वेंचर, चुनाभट्टी, मुंबई | २८००० |
| ३ | अभिजित घाणेकर, डोंबिवली (पू)<br>(मालती घाणेकर यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त) | १८००० |
| ४ | राधिका गुप्ते, डोंबिवली (पू)<br>(राधिका गुप्ते व खुशी गुप्ते ह्यांच्या वाढदिवसानिमित्त) | १३६०० |
| ५ | सिध्दार्थ चंदन, डोंबिवली (पू) | १२००० |
| ६ | त्रीकाम्जी भद्रा, मुलुंड | १२००० |
| ७ | डॉ.माधव बैतुले, डोंबिवली (पू) | १२००० |
| ८ | शेषागिरी जाम्बिगी, ठाणे | ८००० |
| ९ | राजाभाऊ पाटकर, डोंबिवली (पू) | ६००० |
| १० | मंजिरी नारघोळकर, डोंबिवली (पू) | ६००० |
| ११ | उमेश गोडसे, डोंबिवली (पू) | ६००० |
| १२ | अनुराधा खेडुळकर, डोंबिवली (प)<br>(बाबू बळीराम म्हात्रे ह्यांचे स्मरणार्थ) | ६००० |
| १३ | श्री. गुरुनरसिंह सारस्वत चॅरिटेबल ट्रस्ट<br>कुळगाव, बदलापूर (पू) | ६००० |
| १४ | नंदा घोडके, डोंबिवली (प) | ६००० |
| १५ | नीलकमल मिश्रा, ठाकुर्ली (पू)<br>(ईशान मिश्रा याच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| १६ | संजू राठोड, डोंबिवली (पू)<br>(पियू राठोड हिच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| १७ | योगेश पाटील, डोंबिवली (पू) | ६००० |
| १८ | व्ही.ए.पोतदार, गोरेगांव (पू)<br>(कै.सौ.उमा पोतदार ह्यांच्या स्मरणार्थ) | ६००० |
| १९ | ओमकार संजय माने, डोंबिवली (पू) | ६००० |
| २० | प्रवीण झावर, ठाकुर्ली (पू) | ६००० |
| २१ | विनोद रघुनाथ सोनावणे, कल्याण (पू) | ६००० |
| २२ | सोहित उन्हीयाल, अंधेरी (प)<br>(सोहित ह्यांच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| २३ | राजेश सलैयन, डोंबिवली (पू) | ६००० |
| २४ | नितीन मुरलीधर मुळे, डोंबिवली (प)<br>(श्री.मुरलीधर व सौ.प्रेमा मुळे ह्यांचे स्मरणार्थ) | ६००० |
| २५ | उदय कल्याणजी पोकर, ठाकुर्ली (पू)<br>(स्व.रूचिता उदय पोकर ह्यांचे स्मरणार्थ) | ६००० |
| २६ | श्रुतिका हुन्नूर, डोंबिवली (प) | ६००० |
| २७ | भावना आंबेकर, ठाकुर्ली (पू) | ६००० |
| २८ | प्रज्ञा पेंडसे, डोंबिवली (पू)<br>(प्राची पेंडसे हिच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| २९ | सविता संजय मोकाशी, कफ्फ परेड, मुंबई<br>(वसंत मोकाशी ह्यांचे स्मरणार्थ) | ६००० |
| ३० | साक्षी मिलिंद दांडे, डोंबिवली (पू) | ६००० |
| ३१ | सुकन राज जैन, कल्याण (प) | ६००० |
| ३२ | राजेश मोदी, डोंबिवली (पू) | ६००० |
| ३३ | प्रवीण कुबेरा, ठाकुर्ली रोड<br>(श्री.पद्मनाभ कुबेरा ह्यांचे स्मरणार्थ) | ६००० |
| ३४ | स्वाती अमोल हेदाळकर, डोंबिवली (पू)<br>(अदिती हिच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| ३५ | दर्पण पाटील, कल्याण (प)<br>(धारा पाटील हिच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| ३६ | वीणा बारोत, डोंबिवली (पू)<br>(श्री.रमेश बारोत ह्यांचे स्मरणार्थ) | ६००० |
| ३७ | शैलजा ढोरे, डोंबिवली (प) | ६००० |
| ३८ | सुधामा असोसिएट प्रायव्हेट, डोंबिवली | ६००० |
| ३९ | प्रियांका चौधरी, ठाकुर्ली (पू) | ६००० |
| ४० | प्रीयांषु रांका, डोंबिवली (पू) | ६००० |
| ४१ | प्रिया प्रकाश साळुंके, अंधेरी (पू) | ६००० |
| ४२ | शोभा गायकवाड, डोंबिवली (पू) | ६००० |
| ४३ | अनुराधा कुलकर्णी, डोंबिवली (पू) | ६००० |
| ४४ | सिद्धापा मुनिगला, डोंबिवली (पू) | ६००० |
| ४५ | दर्पण म्हात्रे, डोंबिवली (प) | ६००० |
| ४६ | कृष्णा पाडुळे, गोरेगाव (प) | ६००० |
| ४७ | मनीषा रवींद्र मिरके, डोंबिवली (पू) | ६००० |
| ४८ | श्रीनाथ अय्यर, कल्याण (पू) | ६००० |
| ४९ | शशिकांत पाटील, डोंबिवली (प) | ६००० |
| ५० | नीलकंठ कोळी, ऐरोली, नवी मुंबई | ६००० |
| ५१ | अजीथा नायर, डोंबिवली | ४००० |
| | **एकूण** | **४,४३,६००** |

इवॉनिक भेट - दि.२६ फेब्रुवारी २०२६




Evonik Catalyst pvt. Ltd. जर्मनी व IndianCSR प्रोजेक्ट हेड ह्यांची संस्थेस सदिच्छा भेट

## आनंदमेळा - दि.११ एप्रिल २०२६




आनंदमेळ्याचे प्रमुख पाहुणे रोटरीचे डॉ.संदीप घरत यांना स्मृतिचिन्ह देताना
अध्यक्षा श्रीमती राधिका गुप्ते, सचिव श्री.मनोज प्रधान व खजिनदार श्री.प्रविण कुबेरा.



आनंद मेळ्यात विविध स्टॉलची पहाणी करतांना पाहुणे डॉ.संदीप घरत व संस्थेच्या अध्यक्षा राधिका गुप्ते

# ASTITVA TRUST, DOMBIVLI (Registration No.: F/829/THANE)

## Income & Expenditure Account for the year ending 31st March, 2026

| 31-03-25 | EXPENDITURE | 31-03-26 | 31-03-25 | INCOME | 31-03-26 |
|---|---|---|---|---|---|
| 54458.00 | **To Opening Stock** | **54,458.00** | | | |
| | **To Expenditure in respect of property** | | | **By Rent** | |
| | Rates, Taxes and Cesses | | 628,752.00 | Realised | 1,517,917.00 |
| | Salaries | | | Accrued | |
| | Insurance | | | | |
| | Repair & Maintenance | | | | |
| | **To Establishment Expenses** | | | **By Interest on Bank Accounts** | |
| 1,267,950.47 | To Depreciation (Schedule 2) | **1,175,681.64** | 73,438.00 | Interest on SB Accounts | 73,506.00 |
| 5,108,183.99 | To Establishment Expenses(Sch 6) | **3,035,678.49** | 979,771.00 | Interest on Fixed Deposits | 1,380,412.52 |
| | **To Remuneration to Trustees** | | | | |
| | **To Amount Written off** | | | | |
| | Bad Debts | | 5,678,071.17 | **By Donations** | 2,759,455.64 |
| | Loan Scholarship | | 36,382,639.87 | **By Gross Receipts(Sch 8)** | **35,832,669.51** |
| | Irrecoverable Debts | | 321,900.00 | **By Income from Other Sources** | 115,858.00 |
| | Other Items | | | (Schedule 7) | |
| 20,000.00 | **To Audit Fees** | **23,600.00** | - | | - |
| - | **To Miscellaneous Expenses** | - | 51,015.00 | **By Closing Stock** | 56,581.00 |
| | To Salary | | | | |
| | **To Expenditure on Objects of the Trust** | | | | |
| | a)Religious | | | | |
| 34,089,924.21 | b)Educational (Sch 9) | **32,246,813.75** | | | |
| | c)Medical Relief | | | | |
| | d)Relief of Poverty | | | | |
| | e)Other Charitable Objects | | | | |
| 56,814.00 | To Fire and Burglary Policy | **80,591.00** | | | |
| 3,518,256.37 | To Surplus carried over to Balance Sheet | 5,119,576.79 | | | |
| **44,115,587.04** | | **41,736,399.67** | **44,115,587.04** | | **41,736,399.67** |

As per our Report of even date
**For CA Shekhar S. Patwardhan**
**Partner, Membership No.106547**
**UDIN:** 261065470SNMQP4885

SD/-
**RADHIKA GUPTE**
(President)

SD/-
**MANOJ PRADHAN**
(Secretary)

SD/-
**PRAVIN KUBER**
(Treasurer)

Date : 05.08.2026
Place : Dombivli

# ASTITVA TRUST, DOMBIVLI (Registration No.: F/829/THANE)

## Balance Sheet as on 31st March, 2026

| 31-03-25 | FUNDS & LIABILITIES | RS. | 31-03-26 | 31-03-25 | PROPERTY & ASSETS | RS. | 31-03-26 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **Trust Funds and Corpus:-** | | | | **Fixed & Movable Assets** | | |
| 3,938,544.00 | Balance as per last Balance Sheet | | **3,938,544.00** | | (As per Schedule 2) | | |
| | | | | 21,534,724.71 | Land and Building | 21,289,551.65 | |
| | | | | 3,057,359.33 | Plant and Machinery | 2,765,383.09 | |
| | **Other Earmarked Funds** | | | 2,555,733.78 | Furniture & Fixture | 2,419,843.97 | **26,474,778.71** |
| 16,770,000.00 | **Building Fund** | | **16,770,000.00** | | | | |
| | | | | | **Investments** | | |
| | | | | **14,905,917.00** | Fixed Deposit with SBI | **19,909,927.00** | |
| | | | | **1,500,000.00** | Fixed Deposit With Saraswat | **2,000,000.00** | |
| | | | | - | Fixed Deposit With BOM (Sanman) | **232,452.00** | |
| | | | | 5,000.00 | Investment in Shares | - | **22,142,379.00** |
| 878,887.00 | Govt. Grants for Capital Assets | | **878,887.00** | | | | |
| | (CCTV) | | | | **Deposits** | | |
| | **Liabilities** | | | 15,710.00 | Gas | 15,710.00 | |
| 2,447,296.00 | Salary Payable (Schedule 1) | **13,713,155.00** | | 4,300.00 | Telephone | 4,300.00 | |
| 20,000.00 | Audit Fee Payable | **20,000.00** | | 10,340.00 | Water | 10,340.00 | |
| 129,500.00 | Hostel Mess Deposits | **129,500.00** | | 57,300.00 | M.S.E.B. | 57,300.00 | |
| 220,317.00 | Staff Security Deposits | **220,317.00** | | 1,000.00 | PCO Deposit | 1,000.00 | |
| 150,000.00 | Sanman Deposit | 150,000.00 | **14,232,972.00** | 87,450.00 | Security Deposit | 87,450.00 | **176,100.00** |
| | | | | 51,015.00 | Closing Stock (Schedule 3) | **56,581.00** | |
| 30,194,404.64 | **Income & Expenditure A/C** | | | 6,093,569.00 | Income Outstanding | **18,592,771.00** | |
| | Balance as per last Balance Sheet | **30,194,404.64** | | | (Schedule 4) | | |
| | Add: Surplus during the year | **5,119,576.79** | **35,313,981.43** | 650,881.00 | Other Income(Accrued Interest | **588,551.00** | |
| | | | | 179,664.00 | Tax Deducted at Source | **128,637.00** | **19,366,540.00** |
| | | | | | **Cash & Bank Balances:-** | | |
| | | | | **3,969,103.81** | Bank Balances (Schedule 5) | **2,935,178.72** | |
| | | | | 69,881.00 | Cash in Hand | **39,408.00** | **2,974,586.72** |
| **54,748,948.64** | | | **71,134,384.43** | **54,748,948.64** | | | **71,134,384.43** |

As per our Report of even date
**For CA Shekhar S. Patwardhan**
**Partner, Membership No.106547**
**UDIN:** 261065470SNMQP4885

SD/-
**RADHIKA GUPTE**
(President)

SD/-
**MANOJ PRADHAN**
(Secretary)

SD/-
**PRAVIN KUBER**
(Treasurer)

Date : 05.08.2026
Place : Dombivli

**MSVP & ASSOCIATES**
CHARTERED ACCOUNTANTS

# REPORT OF THE AUDITOR

**We have examined the attached Balance Sheet of ASTITVA TRUST as on 31st March 2026 and the Income and Expenditure Account for the year ended 31st March 2026 as per the provisions of THE MAHARASHTRA PUBLIC TRUSTS ACT, 1950 and report that: -**

1. We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit.

2. In our opinion and to the best of our information and explanation given to us, the said accounts are in agreement with the books of accounts and give a true and fair view : -

    a) In case of The Balance Sheet, of the State of affairs of the Trust as on 31st March, 2026.

    AND

    b) In case of Income and Expenditure account, of the Surplus of the Trust for the year ended 31st March, 2026.

**FOR MSVP & ASSOCIATES.**

**CHARTERED ACCOUNTANTS**

**PLACE: DOMBIVLI** | **CA SHEKHAR S. PATWARDHAN**

**DATED: 05-08-2026** | **Partner**
**M. No. 106547**
**UDIN: 26106547OSNMQP4885**

**Report of an auditor relating to accounts audited under sub-section 33 & 34 and rule 19 of the Maharashtra Public Trusts Act, 1950**
**Registration No.:- F/829/THANE**
**Name of the Public Trust.:- ASTITVA TRUST, DOMBIVLI**
**For the year ending 31ST MARCH, 2026**

| | |
|---|---|
| a) Whether accounts are maintained regularly and in accordance with the provisions f the Act and the rules: | YES |
| b) Whether receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts | YES |
| c) Whether the cash balance and vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts | YES |
| d) Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by the auditor were produced before him. | YES |
| e) Whether a register of movable and immovable properties is properly maintained, the changes therein are communicated from time to time to the regional office, and the defects and inaccuracies mentioned in the previous audit report have been duly compiled with | YES |
| f) Whether the Manager or Trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnished the necessary information required by him. | YES |
| g) Whether any property or funds of the trust were applied for any object or purpose other than the object or purpose of the Trust | NO |
| h) The amounts of outstanding for more than one year and the amounts written off, if any: | NIL |
| i) Whether tenders were invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5,000/- | YES |
| j) Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of Section 35 | NO |
| k) Alienation's, if any, of the immovable property contrary to the provisions of section 36 which have come to the notice of the auditor. | NO |
| l)All cases of irregular, illegal or improper expenditure, or failure or omission to recover Moneys or other property belonging to the public trust or of loss or waste of money or other property thereof, and whether such expenditure, failure,omission,loss or waste was caused in consequences of breach of trust or misapplication or any other misconduct on the part of the trustees or any other person while in the management of the trust. | NIL |
| m) Whether the budget has been filed in the form provided by rule 16A | YES |
| n) Whether the maximum and minimum number of the trustees is maintained | YES |
| o) Whether the meetings are held regularly as provided in such Instrument | YES |
| p) Whether the minute books of the proceedings is maintained | YES |
| q) Whether any of the trustees has any interest in the investment of the trust | NO |
| r) Whether any of the trustees is a debtors or creditors of the trust | NO |
| s) Whether the irregularituies pointed out by the auditors in the accounts of the previous year have been duly compiled with by the trustees during the period of audit. | YES |
| t) Any special matter which the auditor may think fit or necessary to bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner. | NO |

**For MSVP & Associates.**
**Chartered Accountants**

**CA Shekhar S Patwardhan**
**Partner**
**Membership No. 106547**
**UDIN:- 26106547OSNMQP4885**
**Date:- 05/08/2026**



आनंद मेळ्यात गेम स्टॉलवर खेळाचा आनंद घेताना प्रमुख पाहुणे व संस्थेचे विश्वस्त.



मूकबधिर विभागातील विद्यार्थी विराज जामदार ह्या विद्यार्थ्यास ३००० मी. धावण्याच्या
शर्यतीत गोल्ड मेडल तर १५०० मी. धावण्याच्या शर्यतीत ब्राँझ मेडल मिळाले आहे.
म्हणून संस्थेतर्फे त्याचा गौरव करण्यात आला.

# ॥ अस्तित्व ॥

## प्रल्हादराय कागझी इन्स्टिट्यूट फॉर हॅन्डिकॅप्ड

प्लॉट नं. ८, फेज – १, स्टेट बँक रोड, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व)
दूरध्वनी : ९८३३५५६९८१

